नि दि.दा.क्र. ८७/२०१८
संजीव विरुध्द गरवारे वॉल्स रोप्स
निशाणी क्र. २९ पुढे सुरु.

**वादीतर्फे साक्षीदार क्र.१ (स्वतः वादी) यांची पुढील उलटतपासणी शपथेवर सुरु.**
**प्रतिवादीतर्फे विधिज्ञ श्री. डी जी भणगे -**

**३२.** आता मला दस्तयादी निशाणी क्र. ८२ सह दाखल असलेले फोटो क्र.१ व २ दाखविण्यात आले. हे म्हणणे खरे आहे की, त्यात दिसत असलेला मोबाईल नंबर माझ्या पत्नीचा आहे. तसेच त्या यादीसह दाखल असलेले फोटो क्र.३ व ४ आता मला दाखविण्यात आले. हे म्हणणे खरे आहे की, त्यात नमूद प्रॉपर्टी विक्री करण्यासंदर्भात मजकूर नमूद आहे. साक्षीदार सांगतो की, ती प्रॉपर्टी विक्री संदर्भात बोलणी चालू आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदरील मिळकतीत मी हॉटेल चालवायचो व ते हॉटेल सन २०१७ च्या जवळपास बंद पडले होते.

**३३.** हे म्हणणे खरे आहे की, दि. ०२/०५/२०१६ रोजी मी ज्यावेळी कंपनीच्या गेटवर गेलो त्यावेळी मला श्री. जाधव यांनी असे सांगीतले की, तुमची सेवा ऑलरेडी संपुष्टात आली आहे. साक्षीदार पुन्हाहुन सांगतो की, त्यादिवशी त्याबाबत श्री. जाधव यांनी मला मी कंपनीत अर्धा दिवस काम केल्यानंतर माहिती दिली होती. हे म्हणणे खरे आहे की, त्याचाच अर्थ दि. ०२/०५/२०१६ रोजी पूर्वीच माझी सेवा संपुष्टात आली असे त्यांनी मला सांगीतले होते. आता मला दस्त यादी नि.क्र.४/६ सह दाखल दि. १९/०८/२०१५ रोजीचे ई-मेल व्दारे पाठविलेले पत्र दाखविण्यात आले. ते मीच पाठवीले होते. (सदरील दस्त वादीतर्फे दाखल असल्याने व प्रतीवादी पक्षाने वादीस उलटतपासादरम्यान त्याबाबत प्रश्न विचारल्याने तसेच प्रतीवादीने **नि.क्र.८३** नुसार तो दस्त मान्य असल्याचे लेखी पुरसीस दिल्याने त्यास **नि.क्र.८४** देण्यात येते.).

**३४.** हे म्हणणे खरे नाही की, दि. ०४/०७/२०१६ रोजी मला प्रतीवादी कंपनीकडून सेवाउपरांत देय असलेले सर्व क्लेम्स मिळाले होते. त्याची रक्कम माझ्या खात्यात जमा झाली होती याबाबत मला सांगता येणार नाही. मी त्यादिवशीचे माझे बँक खाते तपासुन पाहिलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी दि. ३१ मार्च २०१६ पर्यंतचे सर्व क्लेम्स मला

कंपनीकडून प्राप्त झाले होते. हे म्हणणे खरे नाही की, दि. ३१ मार्च २०१६ रोजी माझी प्रतिवादी कंपनीतील सेवा समाप्त झाली होती. हे म्हणणे खरे नाही की, त्या तारखेपर्यंतचे सर्व क्लेम्स मला मिळालेला असताना सुध्दा ते मिळालेले नाहीत असे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे दि. ०२ मे २०१६ रोजी मला कंपनीत कामावर जाण्याचा प्रश्नच उदभवत नाही.

**उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकूब.**

समक्ष व श्रवणोत्तर स्वीक्रुत

Sd/-

दि. १०/०२/२०२६. (आर.एम. भेंडे)

२ रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, वाई.